INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# सांगली जिल्हयाच्या सम"ध्दीतील पर्यटनाचे योगदान

जालींदर आनंदराव यादव किसन एस. पाटील
अर्थशास्त्र विभाग पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव जि. सांगली

## 1.1 प्रास्ताविक :

आधुनिक काळात पर्यटन व्यवसाय हा नवीन उद्योग म्हणून अधिक गतीने विकसित होत आहे. आज जगातील बहुतेक सर्व देशात पर्यटनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. जगात फार प्राचीन काळापासून पर्यटन कोणत्याही कारणाविना केवळ एक कुतूहल म्हणुन किंवा विशिष्ट हेतूने संशोधन म्हणुन घडून आल्याची इतिहासात उदाहरणे आहेत. प्राचीन काळी चीनी प्रवासी फा–ई–यान हा भारतात आलेला होता. दर्यावर्दी वास्को–दी–गामा हा गोव्याच्या किनारपट्टीवर व्यापारासाठी आलेला होता.

पर्यटन म्हणजे प्रवास. पर्यटन हा शब्द इंग्रजीतील ज्वनतपेउ या शब्दाचे मराठी रुपांतर आहे. ज्वनतपेउ हा शब्द ज्वनत या शब्दापासून तयार झाला आहे. ज्वनत म्हणजे प्रवास व ज्वनतपेज म्हणजे प्रवासी यावरुन पर्यटन हा शब्द तयार झाला आहे. पर्यटन हे देशातील भौगोलिक सीमेत व सीमेबाहेरील परदेशात घडून येते. पर्यटनात पुरातत्ववास्त, इतिहास प्रसिध्द स्थळे, प्राचीन कला निर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्र, नाविण्यपूर्ण औद्योगिक प्रकल्प, निसर्गाचे चमत्कार उदा–कास पठार इत्यांदीचा समावेश होतो. अशा स्थळांना भेट देण्याविषयीचे आकर्षण, कुतूहल, प्रेरणा यातून पर्यटन निर्माण होते. प्रस्तुत शोध निबंधात सांगली जिल्हयातील पर्यटन स्थळे व त्यांना भेट देणारे पर्यटक यांचा जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदांनाचा अभ्यास करणार आहोत.

## 1.2 अभ्यासाची उद्दीष्टये :

1. पर्यटनाचा अर्थ समजावून घेणे.
2. पर्यटनाचे स्वरुप स्पष्ट करणे.
3. सांगली जिल्हयातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.
4. जिल्हयाच्या समध्दीतील पर्यटनाचे महत्व सांगणे.

## 1.3 अभ्यास पध्दती :

सांगली जिल्हयाच्या समध्दीतील पर्यटन व्यवसायाचे स्थान अभ्यासन्याचा प्रयत्न या प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र्ाातील लेख, मासिके यांचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधन निबंधासाठी सांगली जिल्हयातील आर्थिक विकासात पर्यटन व्यवसायाला विशेष महत्व आहे. हे ग"हीत वापरण्यात आले आहे.

## 1.4 पर्यटनाचा अर्थ :

जागतिकीकरणाच्या युगात पर्यटन उद्योगाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन व्यवसाय हा अर्थशास्त्रीय दष्टीकोणातून सेवा क्षेत्रात येतो. सेवा क्षेत्राचा वाढता हिस्सा हा देशाच्या आर्थिक विकासाचे निर्देशक मानले जाते. आर्थिक, सामाजिक, सांस्कतिक व राजकीय द"ष्टया पर्यटन महत्वाचे आहे. त्यामुळे जगातील सर्व देशाली पर्यटन उद्योगाच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. भारतासारख्या विकसनशील देशालाही पर्यटन व्यवसायाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तेव्हा पर्यटनाचा असा अर्थ सांगता येतो की, "जो आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय" तर ऑक्सफर्ड शब्द कोषानुसार "जो उत्कंठेपायी किंवा कुतुहलापोटी एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी किंवा सहज गंमत म्हणून किंवा मी असा प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक असे म्हणतात". पर्यटक हा पर्यटनातील प्रमुख घटक आहे. पर्यटकाशिवाय पर्यटन शन्य बनते.

आज पर्यटनाचे क्षेत्र खूप विस्तारले आहे. देशात व विदेशातही पर्यटन अगदी सहज घडून येत आहे. पूर्वी अन्न, वस्त्र, निवास एवढयाच गरजा सीमित होत्या. आज प्रगतीबरोबर पर्यटन व्यवसायाला गती मिळत आहे. वाहतूक दळणवळण क्षेत्रातील नेत्रदिपक प्रगतीने जगातील माहिती एका क्लिकवर मिळते आहे. नेट–इंटरनेटमुळे मार्गदर्शक उपलब्ध होत आहे त्यामुळे पर्यटनाला चालना मिळत आहे. मात्र पर्यटनाचा कालावधी हा मर्यादीत राहतो. यात्रा, समारंभ, आठवडयातील सुट्या, रजा या काळात पर्यटन घडून येते. ष्जूने ते सोनेश या उक्ती प्रमाणे प्राचीन स्थळे त्यातील भव्यता त्याकाळातील ज्ञान याची कल्पना यावी या हेतूने पर्यटन होते. अलिकडे मनोरंजनासाठी पर्यटन हा हेतू अधिक वाढत आहे.

## 1.5 सांगली जिल्हयातील पर्यटनाचे स्वरुपः

सांगली जिल्हा हा महाराष्टातील सम"ध्द जिल्हा आहे. सांगली जिल्हा हा स्वर्गीय पदमभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील यांची कर्म भूमी असलेला देशाच्या स्वातँत्र्य लढयात अग्रेसर असणाऱ्या क्रांतीकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे पर्यटनातही पुढे असलेला जिल्हा म्हणून त्याचा उल्लेख करावा लागेल अशी पर्यटन स्थळे, निसर्गसौदर्य जिल्हयाला लाभलेले आहे. नैसर्गिकदष्टया विषमतोल असणाऱ्या जिल्हयात पर्यटनाला विशेष महत्व आहे. यामध्ये पवित्र देवस्थाने, प्राचीन मंदिरे, अभयारण्य, किल्ले, स्मारके, डोंगर, उद्याने मशिदी, चर्च, यात्रा, उत्सव इत्यादीचा समावेश होतो. .

आजचा सांगली जिल्हा हा पूर्वीच्या सातारा जिल्हयाचा भाग होता. स्वातँत्र्यानंतर भारत सरकारने 1949 मध्ये तत्कालीन सातारा जिल्हयातील तासगाव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालूके हस्तांतरीत करुन तसेच राज्याच्या इतर संलग्न भागातून मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करुन सहा तालुक्यांचा दक्षिण सातारा नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. पुढे या जिल्हयाचे दि.26 नोव्हेंबर 1960 रोजी दक्षिण सातारा हे नाव बदलून सांगली असे करण्यात आले. सन 1965 मध्ये मिरज व खानापूर या तालुक्यांचे विभाजन करुन कवठेमहांकाळ व आटपाडी असे दोन तालुके नव्याने निर्माण करण्यात आले. त्यानंतर दिनांक 1 जूलै 1999 रोजी खानापूर व तासगाव या तालुक्यांचे विभाजन करुन पलूस हा नवीन तालुका नव्याने निर्माण करण्यात आला. सध्या सांगली जिल्हा हा दहा तालुक्यांचा झाला असून
जिल्हयात सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका तसेच आष्टा, इस्लामपूर, तासगाव, विटा व जत या पाच नगरपालिका कार्यरत आहे. खानापूर, कडेगाव, शिराळा, कवठेमहांकाळ या चार नगरपंचायती नव्याने निर्माण झाल्या आहेत.

सांगली जिल्हयाचे तीन स्वाभाविक विभाग पडतात, त्यामध्ये पावसाचा प्रदेश, नद्यांच्या सान्निध्यातील मध्यम पावसाचा सपाट प्रदेश व पूर्वेकडील पठारांचा व भरड मातीचा, कमी पावसाचा कायमचा दुष्काळी प्रदेश याचा समावेश होतो. पश्चिमेकडील सहयाद्रीच्या पूर्व उताराच्या डोंगररांगा व त्यातून निघणाऱ्या भैरवगड डोंगररांगा यानी शिराळा व वाळवा तहसिलचा पश्चिमभाग व्यापलेला आहे. तो नैसर्गिक समध्दतेने नटलेला आहे. कष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या सानिध्यांतील मध्यम पावसाचा सपाट व सुपिक प्रदेश यामध्ये मिरज तहसिलचा पश्चिम व उत्तर भाग येतो. सांगली जिल्हयाचा पूर्वेकडील प्रदेश हा कमी पावसाचा व भरड मातीचा असून यामध्ये आटपाडी, जत, कवठेमहांकाळ,खानापूर या तालुक्यांचा समावेश होतो. त्याच बरोबर मिरज व तासगांव तालुक्यांचा पूर्व भागही यामध्ये येतो व हा भाग सदैव दुष्काळी म्हणून ओळखला जातो. निसर्गाने याभागावर जणू अन्यायच केला आहे येथील लोकांचा उत्पन्नस्तर कमी आढळतो. त्यामुळे ते सांगली जिहयाच्या पूर्वेकडील भागात स्थलांतरीत होतात.

1.6 जिल्हयातील पर्यटन स्थळे :

सांगली जिल्हयातील पर्यटन स्थळांची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| अ. नं. | तालुका | एकूण मंदिरे | स्मारके | किल्ले | डोंगर | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिराळा | 445 | 04 | 02 | 20 | 03 |
| 2 | वाळवा | 395 | 08 | 01 | 04 | 04 |
| 3 | पलूस | 130 | 02 | 0 | 02 | 03 |
| 4 | खानापूर | 95 | 01 | 01 | 03 | 05 |
| 5 | आटपाडी | 124 | 01 | 03 | 0 | 03 |
| 6 | तसगाव | 105 | 01 | 0 | 02 | 04 |
| 7 | मिरज | 266 | 07 | 01 | 02 | 08 |
| 8 | कवठेमहांकाळ | 198 | 04 | 0 | 02 | 05 |
| 9 | ज्त | 138 | 01 | 01 | 01 | 05 |
| 10 | कडेगाव | 120 | 01 | 0 | 03 | 06 |

संदर्भ : जिल्हा पाहणी अहवाल

वरील कोष्टकात पर्यटन स्थळांची ढोबळ माहिती दिलेली आहे. यामध्ये सर्व छोटी–मोठी मंदिरे, सपदके किल्ले व डोंगर यांचा उल्लेख केला आहे तर इतर स्थळामध्ये उद्यान, समाधी स्थळे, इत्यादींचा समावेश आहे. यातील काही प्रमुख आणि महत्वाच्या पर्यटन स्थळांचा उल्लेख तालुका निहाय पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. शिराळा :
    1. शिराळा येथील नागपंचमी उत्सव
    2. श्री गोरखनाथ मंदीर
    3. चांदोली धरण व अभयारण्य
    4. प्रचीतीगड किल्ला
    5. गिरजवडे येथील जोतीर्लिंग मंदिर
2. वाळवा :
    1. किल्ले मच्छिंद्रंगड व मच्छिंद्रनाथाचे मंदिर
    2. बहे येथील श्री रामलिंग मंदिर
    3. नरसिंहपूर येथील भुयारातील श्री नसिंह मंदिर
    4. उरण इस्लामपूर येथील संभुआप्पा देवालय
    5. शिवपूरी येथील सिध्देश्वर मंदिर
3. पलूस :
    1. श्रीक्षेत्र औदुंबर व दत्त मंदिर
    2. पलूस येथील श्री धोंडी महाराज समाधी
    3. ब्रम्हनाळ येथील कृष्णा व येरळा संगम
    4. ब्रम्हनाळ येथील राजयोगी आनंदमुर्ती समाधी
    5. भूवनेश्वर येथील भूवनेश्वर देवीचे अतिप्राचीन मंदिर
4. खानापूर
    1. रेणावी येथील रेवणसिध्द मंदिर व मुळ देवस्थान मंदिर
    2. पळशीजवळील श्री शुकाचार्य मंदिर
    3. पारे येथील दरगोबा देवस्थान
    4. रेवणगाव येथील वेताळगुरू देवस्थान
    5. खानापूर येथील दर्गा
    6. ढवळेश्वर येथील प्राचीन महादेव मंदिर
    7. विटा येथील पालखी शर्यती
    8. बानुरगड श्री बहिर्जी नाईक यांची समाधी.
5. आटपाडी :
    1. आटपाडी तालुक्यातील स्वतंत्रपूर येथील खुला तुरुंग
    2. खरसुंडी येथील श्री सिध्दनाथ मंदिर
    3. वलवण येथील मोरांचे थवे
    4. भिवघाट येथील भिमाशंकर मंदिर
    5. ब्रिटीशकालीन राजेवाडी तलाव
    6. नेलकरंजी येथील श्री जकाईदेवी मंदिर
    7. करगणी येथील श्रीराम मंदिर
6. तासगाव :
    1. तासगाव येथील श्री गोपूर व श्री गणेश मंदिर
    2. कवठेएकंद येथील अतिप्राचीन श्री सिध्दराज मंदिर
    3. आरेवाडी येथील राधाकृष्ण गोपाळ मंदिर
7. मिरज :
    1. सांगली येथील श्री गणेश मंदिर
    2. स्वर्गीय वसंतरावदादा पाटील यांची समाधी
    3. हरिपूर येथील श्री संगमेश्वर देवालय व कृष्णा व वारणा नद्यांचा संगम
    4. तुंग येथील समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापन केलेले मारुती मंदिर
    5. ख्वॉजा शमशुददीन मिरासाहब दर्गा
    6. भोसेजवळील दंडोबा अभयारण्य प्राचीन गुहा व यल्लमादेवी मंदिर
    7. बेळंकीजवळील श्री सिध्देश्वर मंदिर
8. कवठेमहांकाळ :
    1. कवठेमहांकाळ येथील श्री महाकाली मंदिर
    2. आरेवाडी येथील श्री बिरोबा देवस्थान
9. जत
    1. जत येथील श्री यल्लतादेवी मंदिर व श्रीराम मंदिर
    2. बनाळी येथील बनशंकरी मंदिर
    3. गुहापूरचे यल्लामादेवी मंदिर
    4. गुडघरी सिध्दनाथाचे हेमाडपंथी मंदिर
    5. बिळुर येथील मठ
    6. गिरगाव येथील श्री लक्ष्मी मंदिर
    7. सोरडी येथील श्री दत्त मंदिर व मलाकसिध्द मंदिर
10. कडेगाव :
    1. सागरेश्वर अभयारण्य आणि सागरेश्वर मंदिर
    2. कडेपूर येथील श्री डोंगराई देवी मंदिर
    3. सोनसळ येथील चौरंगीनाथ मंदिर
    4. देवराष्टे येथील कै. यशवंतराव चव्हाण याची जन्मभूमी
    5. कडेगाव येथील मोहरम

## 1.7 सांगली जिल्हयाच्या आर्थिक विकासातील पर्यटनाचे महत्व

अर्थशास्त्रीय द"ष्टिकोणातून पर्यटन उद्योगाला विशेष महत्व आहे. जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्था या पर्यटन उद्योगावर आत्मनिर्भर आहेत. हॉगकॉग, थायलंड, नेपाळ, स्पेन, युरोप या देशांच्या अर्थव्यवस्था सर्वस्वी पर्यटनावर अवलंबून आहेत. पर्यटन हा असा व्यवसाय आहे की ज्यामुळे त्या देशाच्या, प्रदेशाच्या सम"ध्दीत वाढ होते. भारतातही 1960 नंतर पर्यटन उध्योगाला महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात उत्पन्न प्राप्त होत आहे. त्याच्या परिणाम अर्थव्यवस्थेतील पैशाची गतिशीलता वाढते. उध्योग वाढीला चालना मिळते मागणीत वाढ होते. यातुन पुन्हा गुणक पध्दतीने उत्पन्नात वाढ होते. सांगली जिल्हयातीलविविध पर्यटन स्थळांना जिल्हयातील व राज्यातील इतर जिल्हयांतून, देशातून, परकीय पर्यटकाकडून भेटी दिल्या जातात. त्यामुळे जिल्हयाच्या विकासास मदत झाली आहे. विकासातील पर्यटनाचे महत्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल

1. रोजगार निर्मिती– पर्यटनाचा एक महत्वाचा फायदा म्हणजे रोजगार व"ध्दी होय. पर्यटन व्यवसायातील रोजगार निर्मिती ही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपाची असते. तसेच कुशल वा अकुशल, पुरुष–स्त्रिया या सर्वानाच काम मिळते. असा रोजगार कायमस्वरुपी किंवा हंगामी स्वरुपातील असतो. त्यामुळे या व्यवसायातून स्थानिक लोकांच्या रोजी रोटीचा प्रश्न काही प्रमाणात सुटतो. यामध्ये वस्तू व सेवा विक्रेते व उत्पादक यांचा समावेश होतो. तसेच याशिवाय मोटार डधयव्हर, हॉटेल व्यवसायिक, यामध्ये काम करणारे कामगार, गाईड, लेखनिक, मॅनेजर इत्यादींनाही रोजगार मिळतो. पर्यटन व्यवसाय हा श्रमप्रधान व्यवसाय असल्याने कमी भांडवलात अधिक रोजगार निर्माण होतो. परिणामी बेरोजगारीचा प्रमुख प्रश्न सोडवून जिल्हयाच्या व देशाच्या विकासाला हातभार लागतो आहे.

2. बाजारपेठांच्या विकास :– पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे बाजारपेठांच्या विकास होत आहे. या भागातील पिकांना, फळांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होत आहे. पर्यटन स्थळांकडे जाणा–या रस्त्यावर शेतकरी आपला भाजी–पाला रास्त भावाने विकतो आहे. द्राक्ष, डाळिंबे, बोर इत्यादी फळांची तो विक्री करतो आहे. मक्याची कणसे भाजून तो विकतो आहे ऊसाचा रस काढून विकत आहे. रस्त्यावरील शेतमालाची नवीन बाजार पेठ पर्यटन व्यवसायामुळे निर्माण होत आहे. स्थानिक कारागिरांनी बनविलेल्या

हस्त वस्तूंना मोठी बाजार पेठ उपलब्ध होत आहे. यामध्ये चिनी मातीची भांडी, लाकडी वस्तू, खेळणी इ. वस्तूंना बाजारपेठ मिळत आहे. बाजारपेठेच्या विस्ताराने आर्थिक विकासास गती मिळत आहे.

3. सरकारच्या महसूलात वाढ :–पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असणारे विविध दुकाने, उपहार ग"ह, हॉटेलस, रसवंती ग"ह, शीत पेयांची दुकाने, वाहने, पर्यटक यावर आकारला जाणारा कर हा सरकारच्या उत्पन्नाच्या प्रमुख मार्ग बनतो. स्थानिक संस्थानाही कर रुपाने उत्पन्न मिळते त्यातून त्या भागाच्या विकासाला चालना मिळते आज जिल्हयात पर्यटन स्थळांच्या ठिकाणी अनेक सोयी सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

4. राष्टधीय उत्पन्नात वाढ :– पर्यटनामुळे राष्टधीय उत्पन्नाची निर्मिती होते. पर्यटकांना विकल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांच्या विक्रीतून उत्पन्न प्राप्त होते. त्या उत्पन्नाचा परिणाम गुणित पध्दतीने होवून पुन्हा उत्पन्नात अधिक पटीने वाढ होते. अर्थव्यवस्थेत एकाचा खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. त्यातून मागणी वाढते उत्पादन वाढते व उत्पन्नात वाढ होते. अशा प्रकारे पर्यटन व्यवसायाने राष्टधीय उत्पन्न वाढीला मदत होते.

5. आर्थिक विकासाला सहाय्यभूतः– पर्यटन व्यवसायाने विकसनशील देशातील आर्थिक विकासाची प्रकिया गतिमान होण्यास मदत होते. आर्थिक विकास ही निरंतर चालणारी दीर्घकालीन प्रकिया आहे. पर्यटक हे ग्राहक असतात. ते जो पैसा खर्च करतात त्याचा फक्त पर्यटन व्यवसायाला फायदा होतो असे नाही तर सामाजिक सुविधा, वाहतूक दळणवळणाच्या साधनात वाढ होत त्यातून विकासाची प्रकिया सुरू होते व गतिमान बनते. म्हणजेच पर्यटकानी खर्च केलेला पैसा अनेक ठिकाणी झिरपत जातो. अर्थशास्त्रीय भाषेत याला गुणक परिणाम असे म्हणतात. म्हणजेच पर्यटन व आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे.

6. प्रादेशिक विकासः– आर्थिक विकास प्रकियेत समतोलित विकासाला विशेष असे महत्व आहे. देशातील विविध भौगोलिक रचना पाहिल्यास काही प्रदेश हे नैसर्गिक कृपादृष्टिने मागासलेले राहतात. परंतु अशा भागात पर्यटन व्यवसायाने विकासाची प्रकिया पुढे जावू शकते. मागास प्रदेशाच्या विकासाला दुसऱ्या भागातून आलेल्या पर्यटकांच्या वस्तू व सेवांच्या खरेदीमुळे विकासास मदत होते.

6. परकीय चलनाची उपलब्धता :– पर्यटन व्यवसाय देशाच्या अर्थव्यवस्थेला अत्यंत आवश्यक असणारे दूर्मिळ परकीय चलन मिळवून देतो. त्यामुळे भारता सारख्या विकसनशील राष्टधच्या व्यवहारतोलात निर्माण होणारी प्रतिकुलता दूर होण्यास मदत होते. परदेशी पर्यटकानी दिलेल्या भेटीतून त्यानी खरेदी केलेल्या वस्तू व सेवा च्या माध्यमातून देशांतर्गत बाजारपेठेत परकीय चलन मिळते.

अशा प्रकारे पर्यटनामुळे आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम दिसून येतात. स्थानिक संसाधनांचा अधिक कार्यक्षमपणे वापर होवू लागण्याने विकासाचा मार्ग खुला होतो.

**1.8 निष्कर्ष :–**

1. पर्यटन व्यवसायामुळे स्थानिक लोकांना हंगामी वा कायम स्वरूपी रोजगार प्राप्त झाला आहे.
2. पर्यटन व्यवसायाने बाजारपेठ विस्तारण्यास मदत झाली आहे.
3. शेतीमालाचा रस्त्यावरील बाजार ही नवीन संकल्पना निर्माण होत आहे.
4. शेतीपूरक वस्तूंचा वापर व त्याची माहिती पर्यटनामुळे प्राप्त होत आहे परिणामी त्याचा वापर वाढत आहे.
5. पर्यटनामुळे ग्रामीण लघु व कुटीर उघ्यागोचा विकास होत आहे.
6. सांगली जिल्हयातील आर्थिक प्रगतीस पर्यटन व्यवसायाने हातभार लावला आहे.
7. जिल्हयातील मागास व नेहमी दुष्काळी छायेत असणाऱ्या भागातील लोकांच्या उत्पन्न वाढीस मदत झाली आहे.
8. पर्यटन व्यवसायामुळे जिल्हयातील सामाजिक सुविधांमध्ये वाढ झालेली दिसून येते.

**1.9 सारांशः–**

पर्यटन व्यवसायाने जिल्हयाच्या आर्थिक विकासात भर घातली आहे. जिल्हयातील नैसर्गिक संपदा भौगोलिक रचना व इतिहास पाहता पर्यटन व्यवसायाच्या वाढीस अजून बराच वाव आहे. पर्यटनाचे केंद्र जर सांगली शहर केले व तेथून बसने वा स्वतःच्या वाहनांने तीन भागांना तीन दिवसात पूर्ण सांगली जिल्हा पाहता येईल. निवासाच्या द"ष्टीने व सोयी सुविधांचा विचार करता सांगली हे शहर योग्य ठरते. तसेच रेवणसिध्द विटा, डोंगराई मंदिर कडेगाव, चौरंघीनाथ सोनसळ, सागरेश्वर अभयारण्य इ. ठिकाणी पर्यटकांना राहण्याची सोय उपलब्ध आहे त्याचाही लाभ घेता येईल. अशा प्रकारे पर्यटनाच्या प्रगती शिवाय देशाची प्रगतीस गती प्राप्त होणार नाही हे मात्र निश्चित!

**1.10 संदर्भ :–**


1. डॉ. विठ्ठल घारपूरे : पर्यटन भूगोल
2. सांगली जिल्हा सामाजिक, आर्थिक पाहणी 2010.11
3. कुलकर्णी व दत्ता : महाराष्टधतील पर्यटनस्थळे

4- W.W.W. Mysangli.com

5- Dr. Jay kumar and Dr. J Fredrick – Ecp Tourism In India

6. संतोष दास्तानोः महाराष्टध 2010